**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार २००९ च्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय आश्रमशाळा व स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षक पदांचे संचमान्यतेचे निकष निश्चित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अआशा-२०१९/ प्र.क्र.१०१/ का.११**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख : १८ जुलै, २०१९

**वाचा :**

१) केंद्र शासनाचा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९.
२) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षक हक्क नियम, २०११.
३) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५/ टिएनटी-२, दिनांक २८ ऑगस्ट, २०१५.
४) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५/ टिएनटी-२, दिनांक ८ जानेवारी, २०१६.

**प्रस्तावना :**

आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील दुर्गम व डोंगराळ भागातील सामाजिक / शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या आदिवासी समाजाच्या मुला-मुलींसाठी निवासी आश्रमशाळा सुरु करण्यात आलेल्या आहेत. सदर निवासी आश्रमशाळा शासनामार्फत तसेच स्वयंसेवी संस्थामार्फत अनुदानित तत्वावर चालविण्यात येतात. सद्यस्थितीत राज्यामध्ये ४९६ शासकीय व ५५६ अनुदानित आश्रमशाळा मंजूर असून सदर आश्रमशाळांमध्ये एकूण ४,५५,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

२. केंद्र शासनाच्या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत एका शिक्षकाने ३० विद्यार्थ्यांना शिकविणे अपेक्षित आहे. हे ३० विद्यार्थी एकाच वर्गातील असावे असे नाही. कायद्यात अशी तरतूद करत असताना शिक्षक बहुवर्ग अध्यापक राहील हे अपेक्षिले गेले आहे. शिक्षक तसेच समाजाने हे समजून घेणे आवश्यक आहे की, प्रत्येक विद्यार्थी विशिष्ट असतो. त्याचे विचार, भावना तसेच शिकण्याची गती वेगळी असते. त्यामुळे ३० विद्यार्थी एकाच वर्गाचे दिसत असले तरी त्यांच्या शिकण्याच्या पातळ्या ३० वेगवेगळ्या स्तरावर असतात. त्यामुळे या सर्व विद्यार्थ्यांना एकाच वर्गात आहेत म्हणून "एकाच स्तरावर समजून" सारखे शिकवता येणार नाही. त्याची प्रचिती आजच्या शिक्षण व्यवस्थेत प्रकर्षाने जाणवत आहे. अशा प्रकारे बहुवर्ग/बहुस्तर अध्यापन जमत नसल्याने आलेल्या अपयशाचे दोषारोपण शिक्षण हक्क कायद्यातील काही तरतुदींवर केले जात आहेत. या बाबींचा विचार करुन शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने दिनांक २८.०८.२०१५ च्या शासन निर्णयान्वये संचमान्यतेचे सुधारित निकष निश्चित केलेले आहेत.

३. उपरोक्त सर्व बाबींची आवश्यकता विचारात घेऊन विद्यार्थी संख्येच्या आधारावर निकष ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या उपरोक्त शासन

निर्णयाच्या धर्तीवर आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय आश्रमशाळा व स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षक पदांच्या संचमान्यतेचे सुधारित निकष विहित करणेबाबत शासन आता पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

केंद्र शासनाच्या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदी विचारात घेऊन आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय आश्रमशाळा व स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या राज्यातील सर्व अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या आधारावर शिक्षक पदे मंजूर करणे, एकाच वर्गात अधिक विद्यार्थी असल्यास शिक्षक पदे मंजूर करणे/सुरु ठेवणे इत्यादी बाबतचे निकष पुढीलप्रमाणे विहित करण्यात येत आहेत.

**१. पूर्व प्राथमिक आश्रमशाळा (इयत्ता १ ली ते ५ वी)**

| इयत्ता | प्रवेशित विद्यार्थी पटसंख्या (निवासी व बहिस्थ) | मंजूर शिक्षक संख्या |
|---|---|---|
| १ ली ते ५ वी (पूर्व प्राथमिक) | ६० विद्यार्थ्यांपर्यंत | २ शिक्षक |
| | ६१ ते ९० विद्यार्थ्यांपर्यंत | ३ शिक्षक |
| | ९१ ते १२० विद्यार्थ्यांपर्यंत | ४ शिक्षक |
| | १२१ ते २०० विद्यार्थ्यांपर्यंत | ५ शिक्षक |
| | १५० विद्यार्थी पटसंख्येच्या वर | ५ शिक्षक व<br>१ मुख्याध्यापक |

१.१ एखाद्या शाळेत वर्ग ३ किंवा ४ किंवा ५ मध्ये एकाच वर्गात कमीत कमी २० पेक्षा अधिक विद्यार्थी असतील तर त्या त्या वर्गासाठी वेगळे शिक्षक अनुज्ञेय राहतील. मात्र तुकडी व्यवस्था बंद करण्यात आल्यामुळे संपूर्ण शाळेत शिकत असलेल्या एका वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची संख्या यासाठी विचारात घ्यावयाची आहे.

१.२ एखाद्या शाळेत वर्ग १ आणि वर्ग २ तसेच वर्ग ३ ते ५ मध्ये प्रत्येकी २० पेक्षा कमी विद्यार्थी असल्यास बहुवर्ग अध्यापन पद्धती वापरावयाची आहे.

**२. उच्च प्राथमिक आश्रमशाळा (इयत्ता ६ वी ते ८ वी)**

| इयत्ता | प्रवेशित विद्यार्थी पटसंख्या (निवासी व बहिस्थ) | मंजूर शिक्षक संख्या |
|---|---|---|
| ६ वी ते ८ वी (उच्च प्राथमिक) | ३५ विद्यार्थ्यांपर्यंत | १ शिक्षक |
| | १०५ विद्यार्थ्यांपर्यंत | ३ शिक्षक<br>(१-विज्ञान व गणित,<br>१-भाषा,<br>१- समाजशास्त्र) |

२.१ इयत्ता ६ वी ते ८ वी या वर्गांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांची शैक्षणिक अर्हता शिक्षण हक्क कायद्यानुसार B.Sc.B.Ed/B.A.B.Ed. असणे आवश्यक आहे. तथापि, सदर पदावर सध्या कार्यरत असलेले पदवीधर शिक्षक हे सेवानिवृत्त होईपर्यंत सदर पदावर कार्यरत राहतील.

२.२ या शासन निर्णयानंतर रिक्त होणारी पदे ही उपरोक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवारांमधून तसेच शासनाच्या आरक्षण धोरणानुसार भरण्यात यावीत.

**३. माध्यमिक आश्रमशाळा (इयत्ता ९ वी ते १० वी)**

३.१ इयत्ता ९ वी साठी २ व इयत्ता १० वी साठी २ असे एकूण ४ शिक्षक अनुज्ञेय राहतील. मात्र दोन्ही वर्गासाठी एकूण किमान ४० विद्यार्थी असणे आवश्यक राहील. सलग दोन वर्षे ४० पेक्षा कमी विद्यार्थीसंख्या असल्यास सदर पदे व्यपगत करण्यात यावीत.

**४. उच्च माध्यमिक आश्रमशाळा (इयत्ता ११ वी ते १२ वी)**

| **शाखा** | **मंजूर शिक्षक संख्या** |
|---|---|
| कला शाखा | ४ शिक्षक |
| वाणिज्य शाखा | ४ शिक्षक |
| विज्ञान शाखा | ५ शिक्षक |
| कला व वाणिज्य शाखा | ७ शिक्षक |
| कला व वाणिज्य यापैकी एक व विज्ञान शाखा असल्यास | ८ शिक्षक |

संबंधीत शाखेत (इयत्ता ११ वी व १२ वी) दोन्ही वर्गासाठी एकूण किमान ४० विद्यार्थी असणे आवश्यक राहील. सलग दोन वर्षे किमान ४० विद्यार्थी नसल्यास सदरची पदे व्यपगत करण्यात यावीत. तसेच प्रत्येक विषयाला किमान २० विद्यार्थी असणे आवश्यक राहील. एखाद्या विषयाला सलग दोन वर्षे २० पेक्षा कमी विद्यार्थीसंख्या असल्यास संबंधीत विषयाचे पद व्यपगत करण्यात येईल.

**५. संयुक्त शाळा –**

(**१**) वर्ग १ ते ७, (**२**) वर्ग १ ते ८, (**३**) वर्ग १ ते १०, (**४**) वर्ग १ ते १२, (**५**) वर्ग ५ ते १०, (**६**) वर्ग ५ ते १२, (**७**) वर्ग ६ ते १२, (**८**) वर्ग ८ ते १०, (**९**) वर्ग ८ ते १२.

वरील पैकी कोणत्याही प्रकारच्या शाळांमध्ये शाळेचा वेग-वेगळा भाग समजून एकापेक्षा अधिक मुख्याध्यापक पदे अनुज्ञेय ठरत असल्यास फक्त वरिष्ठ शाळेमधील मुख्याध्यापक पद अनुज्ञेय राहील.

**५.१** सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थी **संख्या १०० पेक्षा कमी झाल्यास** मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय राहणार नाही.

**५.२** सध्याच्या फक्त १ ते ७ पर्यंतच्या आश्रम शाळेत मुख्याध्यापक पदाबाबत कोणताही बदल झालेला नाही.

**६. मुख्याध्यापकाची पदे –**

**६.१ प्राथमिक मुख्याध्यापक (वर्ग १ ते ५) :-** प्राथमिक आश्रमशाळेत १५० विद्यार्थी पटसंख्येवर मुख्याध्यापक पद देय राहील. मुख्याध्यापक पदाकरिता किमान ५ वर्षाचा प्राथमिक शाळेतील

शिक्षक म्हणून अनुभव असणे आवश्यक आहे. त्यामध्ये शिक्षण सेवक कालावधी ग्राह्य धरण्यात येईल. प्राथमिक मुख्याध्यापक हे पद पदोन्नतीने सेवाज्येष्ठतेनुसार व आरक्षणानुसार भरणे बंधनकारक राहील.

६.२ **माध्यमिक मुख्याध्यापक (वर्ग ६ ते १० किंवा ६ ते १२ ):-** ज्या आश्रमशाळेमध्ये उच्च माध्यमिक म्हणजेच इयत्ता ११ वी व १२ वी चे वर्ग नाहीत अशा आश्रमशाळांमध्ये इयत्ता ६ वी ते १० वी ची विद्यार्थीसंख्या मुख्याध्यापक पदासाठी ग्राह्य धरण्यात यावी. परंतू ज्या आश्रमशाळेमध्ये उच्च माध्यमिकचे वर्ग आहेत अशा आश्रमशाळेमध्ये इयत्ता ६ वी ते १२ वी ची विद्यार्थीसंख्या मुख्याध्यापक पदासाठी ग्राह्य धरण्यात यावी. त्यासाठी किमान १५० विद्यार्थीसंख्या आवश्यक राहील.

६.३ **प्राथमिक/माध्यमिक मुख्याध्यापक** ही पदे सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने व आरक्षणानुसार भरणे बंधनकारक राहील.

६.४ सध्याच्या फक्त १ ते ७ पर्यंतच्या आश्रम शाळेतील मुख्याध्यापक पदाबाबत कोणताही बदल झालेला नाही.

६.५ आश्रमशाळांमध्ये मान्य झालेल्या मुख्याध्यापकाचे पद शासन निर्णयान्वये अनुज्ञेय ठरत नसल्यास त्यांना त्या त्या व्यवस्थापनाच्या अन्य शाळांमधील मुख्याध्यापक पदावर समायोजित करावे. अशा समायोजनानंतरही त्याच व्यवस्थापनाच्या कार्यक्षेत्रात मुख्याध्यापक पद अतिरिक्त ठरत असल्यास सदर मुख्याध्यापकांना त्यांच्या कार्यरत ठिकाणी ते सेवानिवृत्त होईपर्यंत/पटसंख्येत वाढ होईपर्यंत कायम ठेवावे. सदर मुख्याध्यापकाच्या सेवानिवृत्ती अथवा अन्य तत्सम कारणांनी पद रिक्त झाल्यानंतर सदर आश्रमशाळेस सुधारित निकषांप्रमाणे पटसंख्येअभावी मुख्याध्यापकाचे पद देय होत नसल्यास सदर पद व्यपगत करावे.

७. उपरोक्त पदांव्यतिरिक्त इयत्ता १ ली ते १० वी व इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत असलेल्या प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेमध्ये कला/संगीत, संगणक ऐच्छिक विषयासह व शारिरिक शिक्षण यासाठी १०० पेक्षा अधिक विद्यार्थी प्रवेशित असल्यास एक पूर्ण वेळ शिक्षक मानधन तत्वावर नियुक्त करण्यात यावा. शासकीय आश्रमशाळांसाठी याबाबत वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी. तसेच, अनुदानित आश्रमशाळांमधील या पदांबाबतची अर्हता व मानधन शासकीय आश्रमशाळेसाठी वेळोवेळी विहीत केल्याप्रमाणे असेल. तसेच अनुदानित आश्रमशाळेमध्ये या पदांसाठी निवड प्रचलीत पद्धतीने करण्यात येईल. संस्थेने निवड समितीत संबंधीत विषयतज्ञाचा समावेश करावा.

**८. महत्वाचे-**

८.१ या शासन निर्णयापूर्वीच्या निकषाप्रमाणे मान्य झालेली शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरत असल्यास त्यांना त्या त्या व्यवस्थापनाच्या अन्य शाळांमध्ये समायोजित करावे. त्याच व्यवस्थापनाच्या कार्यक्षेत्रात शिक्षक अतिरिक्त ठरत असल्यास त्यांना संबंधित अपर आयुक्तांच्या कार्यक्षेत्रात इतर व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये रिक्त जागेवर समायोजित करावे.

८.२ एखाद्या शाळेत ज्या -त्या वर्गामध्ये निकषापेक्षा अधिक विद्यार्थी झाल्यास विद्यार्थी : शिक्षक प्रमाणानुसार शिक्षक पदांची वाढ होईल. तथापि त्यासाठी त्या शाळेने आवश्यक ते निकष पूर्ण केले पाहिजेत.

८.३ एखाद्या शाळेत विद्यार्थांच्या संख्येनुसार शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता आहे. अशा शिक्षकांना अतिरिक्त ठरविताना संबंधित शाळेमध्ये प्रत्येक विषयाचे शिक्षक उपलब्ध राहतील आणि आरक्षण धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. तसेच शिक्षकांच्या समायोजनाबाबत महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी नियमावली, १९८१ मधील तरतुदी आणि निकष कायम राहतील.

८.४ सन २०१९-२० च्या संचमान्यतेसाठी सर्व आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांनी ऑनलाईन पोर्टलवर दिनांक ३०.१०.२०१९ पर्यंत माहिती भरावी.

८.५ सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षासाठी ३० सप्टेंबर, २०१९ अखेरची विद्यार्थीसंख्या संचमान्यतेसाठी ग्राह्य धरण्यात यावी. या शासन निर्णयानुसार सन २०१९-२० ची संचमान्यता सरल प्रणालीमध्ये भरलेल्या माहितीच्या आधारे करण्यात यावी.

८.६ संचमान्यता झाल्याशिवाय पद मान्यतेचे प्रस्ताव विचारात घेऊ नयेत. संचमान्यतेच्या प्रस्तावास शासनाची मान्यता घेण्यात यावी.

९. आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय व अनुदानित आश्रमशाळांबाबतचे यापूर्वीचे संचमान्यतेचे सर्व आदेश या शासन निर्णयाद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहेत.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१८११२९२४४७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2019.07.18 11:42:12 +05'30'

**(सु.ना.शिंदे)**
**उपसचिव महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद /विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
६. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
७. मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई

९. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१०. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
११. आयुक्त महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, पुणे.
१२. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१३. सर्व सह सचिव/उप सचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
१४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर
१५. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
१६. अवर सचिव (का-१५), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. कक्ष अधिकारी (का-१३), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. निवडनस्ती (का.११) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२